तक्रारदार:— उमेश महादेव पाटील
पत्ता:— तायडे गुरुजी नगर,
राजू मंडपवाल्या जवळ,
जावसई गाव, अंबरनाथ
दिनांक:— १७/०४/२०२६

**प्रति,**

१) मा. पोलीस उपायुक्त,
परिमंडळ — ४, उल्हासनगर — ३,
जिल्हा — ठाणे.

२) मा. सहाय्यक पोलीस आयुक्त
अंबरनाथ पोलीस स्टेशन.
जिल्हा — ठाणे.

३) मा. वरीष्ठ पोलीस निरिक्षक,
अंबरनाथ पोलीस स्टेशन.
जिल्हा — ठाणे.

**विषय:— अनधिकृत कॉल सेंटर चालवुन परराष्ट्रीय लोकांची फसवणुक करणारा व हवाला रॅकेटद्वारे मनी लॉड्रींग करणाऱ्या भगवान सुभाष लोटे** या नराधामाने दिनांक १०/०४/२०२६ रोजी माझी मुलगी सिमरन पाटील (वय २६ वर्षे) हिला हॉटेल S3 Park अंबरनाथ (पश्चिम) येथे बोलावुन तिला वर नमुद गैर कारभाराबाबत धमकावुन तिच्यावर लैंगिक अत्याचार करुन व नंतर तिची हत्या करुन फॅन ला लटकविले आणि आपल्या राजकीय ताकदीचा गैरवापर करुन पोलीसांनवर दबाव टाकुन माझ्या मुलीने आत्महत्या केल्याचे भासवुन पोलीस स्टेशनला अनैसगिक मृत्यू झाल्याचे नोंदविले व नंतर भगवान लोटे आणि तिच्या पत्नी व त्यांचे इतर नातेवाईक यांनी मला आणि माझ्या कुटुंबियांना धमकावले तसेच पोलीसांत तक्रार दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याने त्यांच्या विरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ६३, ६६, ६९, १०१, १०३ (१), आणि ३५१ (१), ३५१ (२)(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्याबाबत.

**महोदय,**

मी, **उमेश महादेव पाटील** आपणास विनंतीपूर्वक कळविते की, दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी अंबरनाथ (पश्चिम) येथिल S3 Park या हॉटेलमध्ये माझी मुलगी सिमरन पाटील (वय २६ वर्षे) हिचा संशयास्पद मृत्यू झालेला आहे.

**महोदय,** माझी मुलगी सिमरन पाटील ही भगवान सुभाष लोटे यांच्या मालकीच्या ग्लोब बिझनेस पार्क (अंबरनाथ पश्चिम) येथे स्थित **"Vipro Management Consultant"** या ऑफिसमध्ये काम करत होती. सदर ठिकाणी काम करत असताना भगवान सुभास लोटे याने माझ्या मुलीवर दबाव टाकुन तिला स्वतःच्या प्रेमाच्या जाळ्यात अडकविले होते. सदर ठीकाणी काम करत असताना माझ्या मुलीला आरोपी भगवान सुभाष लोटे द्वारे चालविल्या जाणाऱ्या गैरकारभाराबाबत जसे की अनधिकृत कॉल सेंटर चालवुन परराष्ट्रीय लोकांची फसवणुक करणे व हवाला रॅकेटद्वारे मनी लॉड्रींग करणे इत्यादी बाबी माहित पडल्या होत्या.

**महोदय,** माझी मुलगी सतत मानसिक तणावाखाली असल्याचे आम्हाला निदर्शनास आले असता आम्ही आमच्या मुलीला समजावुन सांगितले की, भगवान सुभाष लोटे हा बरोबर व्यक्ती नाही व त्याने याआधी सुध्दा अनेक मुलींना प्रेम प्रकरणात फसविले आहे. आम्ही आमच्या मुलीला भगवान सुभाष लोटे यांच्या पासून दुर राहण्यासंदर्भात समजावुन सांगितले होते. त्यानंतर माझ्या मुलीने भगवान सुभाष लोटे याला इतर मुलींशी असलेल्या अनैतिक संबंध व त्याच्या अनधिकृत कारभारासंदर्भात उलट विचारपुस करण्यास सुरुवात केली असता भगवान लोटे याने तिच्याशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. व फोन करुन भेटण्यासाठी दबाब टाकला.

**महोदय,** दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी भगवान सुभाष लोटे या नराधामाने माझी मुलगी सिमरन पाटील हिला **''S3 Park अंबरनाथ (पश्चिम)''** या हॉटेल मध्ये बोलावले होते. सदरील हॉटेलमधील रुम ही भगवान सुभाष लोटे याने स्वतःच्या नावाने बुक केलेली होती. भगवान लोटे हा माझ्या मुली सोबत त्या रुममध्ये उपस्थित होता. काही वेळाने तो बाहेर गेला व पुन्हा रुममध्ये परत आल्यावर त्याने पाहिले की, माझ्या मुलीने पंख्याला गळफास घेतले होते हे त्याचे म्हणणे पुर्णपणे चुकीचे असुन भगवान सुभाष लोटे यानेच माझ्या मुलीची हत्या केलेली आहे. सदरील घटनेची माहिती पोलीसांना देण्याचे काम देखील भगवान सुभाष लोटे यांनीच केले आहे. आणि आपल्या राजकीय ताकदीचा वापर करुन पोलीसांनवर दबाव टाकुन माझ्या मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे भासवुन पोलीस स्टेशनला अनैसगिक मृत्यू झाल्याचे नोंदविले आहे.

**महोदय,** वरील सर्व घटनाक्रम पाहता माझ्या मुलीला **आरोपी भगवान सुभाष लोटे** द्वारे चालविल्या जाणाऱ्या गैरकारभाराबाबत जसे की **अनधिकृत कॉल सेंटर चालवुन परराष्ट्रीय लोकांची फसवणुक करणे व हवाला रॅकेटद्वारे मनी लॉड्रींग करणे** इत्यादी बाबी माहित पडल्या असल्या कारणाने तिच्या वर भगवान सुभाष लोटे यांनी प्रचंड शारिरीक आणि मानसिक दबाव टाकुन व तिच्या सोबत जबरदस्ती करुन शारिरीक अत्याचार करुन तिची हत्या केलेली आहे त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे.

**महोदय,** सदरील घटना घडल्यानंतर भगवान सुभाष लोटे याने तिची पत्नी व इतर नातेवाईक सोबत मिळुन मला व माझ्या कुटुंबियाना धमकावले आहे की, **"तुम्ही आम्हाला अजून ओळखत नाही आमची पोहोच खूप मोठी आहे. तुम्ही कुठेही गेला तरी आम्ही सर्व गोष्टी मॅनेज करु"** तसेच जर पोलीसांत तक्रार दिल्यास जीवे मारण्याची धमकी सुध्दा आम्हाला दिलेली आहे. परंतु काही दिवसांनी माझ्या सर्व मित्रमंडळी व नातेवाईकांनी आम्हाला हिमंत दिली आणि तुम्ही पोलीसांत कोणालाही न घाबरता तक्रार करा म्हणुन आज आम्ही तक्रार करण्यासाठी पुढे आलो आहोत.

**महोदय,** सदरील प्रकरणात गुन्हा नोंदवुन सखोल व निष्पक्ष तपास करुन आरोपी नराधाम भगवान लोटे यांच्याविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ६३, ६६, ६९, १०१, १०३ (१), आणि ३५१ (१), ३५१ (२)(३) अंतर्गत लागु होणाऱ्या गंभीर कलमांनुसार गुन्हा दाखल करुन कठोर कायदेशीर कार्यवाही करावी. व माझी मयत मुलगी सिमरन पाटील हिला न्याय मिळवुन द्यावा, ही नम्र विनंती.

तक्रारदार
उमेश महादेव पाटील

- सोबत वृत्तपत्र व इतर कागदपत्र जोडलेले आहे.

A

**Bhaji Market S.O**
**421002**

EM949170185IN - INLAND SPEED POST DOCUMENT

421505-421002

RECEIVER:MA POLICE UPAYUKTA PARIMANDALA 4 UNR3 THANE MAHARASHTRA
- 421002

SENDER:UMESH MAHADEO PATIL
TAYADE GURUJI NAGAR AMBARNTH
THANE MAHARASHTRA
INDIA - 421505

Netaji Bazar S.O (421505) 17-04-2026 14:32:11
ChargedWeight(gms): 34 Phy.Wt(gms): 34 Vol.Wt(gms): NA(L: NA B: NA H: NA)AmountPaid: Rs.23.00 (Cash) BkgRefId: 24662013170426029995

*In case of any grievance - DIAL-18002666868 : IVR NO : 6977949170185*

**A**

**Kansal S.O**

**421501**

**EM949170177IN - INLAND SPEED POST DOCUMENT**

**421505-421501**

**RECEIVER:MA SHAAYAK POLICE AAYUKT**
**AMBARNTH POLICE STATION**
**THANE MAHARASHTRA**
**- 421501**

SENDER:UMESH MAHADEO PATIL
TAYADE GURUJI NAGAR AMBARNTH
THANE MAHARASHTRA
INDIA - 421505

Netaji Bazar S.O (421505) 17-04-2026 14:32:11
ChargedWeight(gms): 24 Phy.Wt(gms): 24 Vol.Wt(gms): NA(L: NA B: NA H: NA)AmountPaid: Rs.23.00 (Cash) BkgRefId: 24662013170426O2995

*In case of any grievance - DIAL-18002666868 : IVR NO : 6977949170177*

A

Ambernath S.O

421501

EM949170163IN - INLAND SPEED POST DOCUMENT

421505-421501

RECEIVER:MA VARISHTHA POLICE NIRISHAK
AMBARNTH POLICE STATION
THANE MAHARASHTRA
- 421501

SENDER:UMESH MAHADEO PATIL
TAYADE GURUJI NAGAR AMBARNTH
THANE MAHARASHTRA
INDIA - 421505

Netaji Bazar S.O (421505) 17-04-2026 14:32:11
ChargedWeight(gms): 34 Phy.Wt(gms): 34 Vol.Wt(gms): NA(L: NA B: NA H: NA)AmountPaid: Rs.23.00 (Cash) BkgRefId: 24662013170426029995

*In case of any grievance - DIAL-18002666868 : IVR NO : 6977949170163*